॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


**✻ सुविचार ✻**
संकटं तुमच्यातली शक्ती,
जिद्द पाहण्यासाठीच येत आसतात.








■ अहमदनगर ■ शुक्रवार, दि. १९ एप्रिल २०२४ ■ वर्ष ५ वे ■ अंक ५० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145




**जनतेची आर्थिक लुबाडणूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा**

पान क्र. २ वर



**येळी गावात भरदिवसा घरफोडी; एकाला पकडले**

पान क्र. ३ वर



**पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्माण करणार**

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### राज कुंद्राची ९७ कोटींची मालमत्ता जप्त

● **मुंबई ।** अंमलबजावणी संचालनालयाने शिल्पा शेट्टी आणि त्यांचे पती राज कुंद्रा यांची ९७ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. यामध्ये शिल्पा शेट्टीचा जुह फ्लॅट आणि बंगला आणि राज कुंद्राच्या नावावर नोंदणीकृत इफिटी शेअर्सचा समावेश आहे. हे प्रकरण २००२ च्या बिटकॉइन पॉन्झी स्कीम घोटाळ्यातील मनी लॉंडिंगशी संबंधित आहे. ईडीने एक्सवर एका पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. व्हेरिएबल टेक प्रायव्हेट लिमिटेड आणि आरोपी दिवंगत अमित भारद्वाज, अजय भारद्वाज, विवेक भारद्वाज, सिम्पी भारद्वाज, महेंद्र भारद्वाज आणि इतरांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस आणि दिल्ली पोलिसांकडे दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीने तपास सुरू केला होता.

### रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून नारायण राणेंना उमेदवारी

● **मुंबई ।** भारतीय जनता पक्षाचे नेते तथा केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाली आहे. या मतदारसंघातून शिवसेनेचे किरण सामंत यांनी उमेदवारी मागितली होती. मात्र, भाजप आणि शिवसेना यांच्यातील तिढा आता सुटला असून किरण सामंत यांनी माघार घेतली असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. त्यानंतर लगेचच भारतीय जनता पक्षाच्या बतीने नारायण राणे यांच्या नावाची घोषणा केली. त्यामुळे महायुतीमधील हा कोकणातील तिढा सामांजस्याने सुटला असे म्हणावे लागेल. महायुतीच्या जागा वाटपामध्ये यामुळे रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाबाबत तिढा निर्माण झाला होता. महायुतीमध्ये आमच्यामध्ये कोणतीही नाराजी नाही. आम्ही ज्या उमेदवाराला भारतीय जनता पक्षाच्या वतीने उमेदवारी देईल, त्या उमेदवाराचा प्रचार करणार असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले.

# लीड नाही तर आमदारकी नाही

## लोकसभेच्या ४५+ साठी महाराष्ट्रात भाजपाचे धोरण

● **मुंबई । वीरभूमी –** लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात महायुतीकडून 'मिशन ४५ प्लस'चा नारा दिल्यानंतर तो पुर्णतवास घेवून जाण्यासाठी अत्यंत गांभीयनि घेतल्याचे दिसून येत आहे. त्यात विशेषतः भाजपने आपल्या आमदारांना खास टार्गेट दिलेले आहे. जो आमदार लोकसभेत टार्गेट पूर्ण करणार नाही त्या आमदारांचे तिकीट घोक्यात येण्याची शक्यता देखील सूत्रांकडून वर्तविली जात आहे.

विश्वसनीय सूत्रांकडून सांगण्यात आले की, जो आमदार लोकसभेच्या उमेदवाराला लीड देईल त्याला पुन्हा तिकीट देण्यात येईल, आणि ज्याच्या मतदारसंघात लीड कमी मिळेल त्याचे आमदारकीचे तिकीट धोक्यात येणार आहे. त्यामुळे लोकसभेच्या उमेदवाराशी मतभेद असले तरीही स्वतःच्या विधानसभेसाठी आमदारांना काम करावे



लागणार आहे.

राज्यातील पहिल्या टप्प्यातील लोकसभा मतदारसंघासाठी आज म्हणजेच शुक्रवारी मतदान होणार आहे.

तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राज्यात प्रचारसभा झाल्या. तर राज्यातील अन्य लोकसभेचे मतदान दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्यात होणार आहे. त्यासाठी बड्या नेत्यांच्या सभा देखील नियोजित आहेत.

असे असताना राज्यात मिशन ४५ प्लस पूर्ण करण्यासाठी एकीकडे हे दिग्गज नेते कामाला लागले असताना दुसरीकडे भाजपने आपल्या आमदारांना देखील त्यांच्या त्यांच्या मतदारसंघातून लीड देणे बंधनकारक केले आहे.

### प्रत्येक आमदाराचं रिपोर्ट कार्ड होणार

■ सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येकाचे रिपोर्ट कार्डच तयार केले जाणार आहे. त्यांच्या मताधिक्याचा उमेदवाराला कसा फायदा झाला, याचे मूल्यमापन यावेळी केले जाणार आहे. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी विधानसभा आमदार आणि इच्छुक उमेदवारांना तशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे पुन्हा आमदारकीचे स्वप्न पाहायचे असेल, तर आतापासूनच जोमाने कामाला सुरुवात करावी लागणार आहे.

## लोकसभेसाठी नगरमध्ये ४२ तर शिर्डीसाठी ३१ अर्जाची विक्री

● **नगर । वीरभूमी –** लोकसभेच्या अहमदनगर व शिडी या दोन्ही मतदारसंघांची निवडणूक अधिसूचना गुरुवारी प्रसिद्ध झाली. पहिल्या दिवशी या दोन्ही मतदारसंघांसाठी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही. मात्र, अहमदनगर मतदारसंघासाठी २२ व्यक्तींनी ४२, तर शिडी मतदारसंघासाठी १८ व्यक्तींनी ३१ उमेदवारी अर्ज नेले आहेत.

अहमदनगर मतदारसंघासाठी नगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात तर शिर्डी मतदारसंघासाठी राहाता येथील राहाता तालुका प्रशासकीय इमारतीमध्ये अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कडक पोलिस बंदोबस्त तैनात ठेण्यात आला आहे.

अर्जाची तपासणी करण्यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या नेतृत्वाखाली १६ कर्मचाऱ्यांची तर शिर्डी मतदारसंघासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी माणिक आहेर यांच्या नेतृत्वाखाली १६ कर्मचाऱ्यांची टीम नियुक्त करण्यात आली आहे. या दोन्ही मतदारसंघांत पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही.

अहमदनगर मतदारसंघासाठी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासाठी अभिजित दिवटे यांनी दोन अर्ज नेले आहेत. आ. प्राजक्त तनपुरे यांच्यासाठी अमोल गुलदगड यांनी चार उमेदवारी अर्ज नेले. याशिवाय या मतदारसंघासाठी ॲड. शिवाजी डमाळे, अनिल शेकटकर, रावसाहेब काळे, सुभाष आल्हाट, सुदाम गंगावणे, कलिमराव पोपळघट, अशोक तांबे, विलास लाकूडझोडे, तुकाराम कोकरे, गिरीश जाधव, दत्तात्रय वाघुंडे, अशोक ढोकणे, सुधीर वैरागर, मंगल भुजबळ, छगन पानसरे, ज्ञानदेव पाडळे व यशवंत म्हस्के यांनी स्वतः साठी अर्ज नेले आहेत. शिर्डी मतदारसंघासाठी १८ व्यक्तींनी ३१ उमेदवारी अर्ज नेले आहेत.

## शिर्डी लोकसभेसाठी उत्कर्षा रुपवते यांना वंचितची उमेदवारी

● **नगर । वीरभूमी –** अकोले तालुक्याच्या भूमिकन्या उत्कर्षा रुपवते यांनी कॉंग्रेस पक्षाच्या महासचिव पदाचा राजीनामा देत वंचितमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांना शिर्डी लोसभेसाठी वंचितची उमेदवारी जाहीर झाली आहे. यामुळे शिर्डी लोकसभा मतदार संघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी होणारी लढत वंचितच्या एंट्रीने तिरंगी होणार आहे.



शिर्डी लोकसभा मतदार संघ कॉंग्रेसच्या वाट्याला न आल्याने उत्कर्षा रुपवते या नाराज झाल्या होत्या. त्यांनी मागील काही दिवसांपासून चाचपणी सुरु केली होती. अखेर उत्कर्षा रुपवते यांनी कॉंग्रेस पक्षाच्या सर्व पदांचा व प्राथमिक सदस्यत्व पदाचा राजीनामा देत वंचित आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत वंचितमध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यांना गुरुवारी शिर्डी लोकसभेसाठी वंचितची उमेदवारी जाहीर झाली आहे.

## व्हीव्हीपॅटवरील निकाल सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवला



● **नवी दिल्ली । वीरभूमी –** मतदारांना व्हीव्हीपॅट मशिनमधून बाहेर येणारी पावती दिल्यास त्याचा गैरवापर होईल, अशी भीती निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात व्यक्त केली. लोकसभा निवडणुकीत ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशिनमधून बाहेर पडणाऱ्या पावत्यांची १०० टक्के पडताळणी करण्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी प्रदीर्घ सुनावणी झाली. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांनी याचिकाकर्ता एडीआर संस्थेसह केंद्रीय निवडणूक आयोग आणि इतर ज्येष्ठ वकिलांचा तब्बल पाच तास युक्तिवाद ऐकल्यानंतर या मुद्द्यावरील आपला निर्णय राखून ठेवला आहे.

ईव्हीएम मशिनमध्ये नोंदविलेली मते आणि व्हीव्हीपॅट मशिनमधून बाहेर येणाऱ्या पावत्यांची १०० टक्के पडताळणी करण्याच्या मागणीसाठी असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) संस्थेने ही याचिका दाखल केली आहे. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. प्रशांत भूषण, गोपाल शंकरनारायण आणि संजय हेगडे यांनी युक्तिवाद केला. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वतीने ॲड. मनिंदरसिंह तर केंद्र सरकारतर्फे महाअधिवक्ता तुषार मेहता यांनी बाजू मांडली. मतदारांना व्हीव्हीपॅट मशिनमधून बाहेर येणारी पावती दिल्यास त्याचा गैरवापर होईल, अशी शक्यता निवडणूक आयोगाच्या वकिलांनी न्यायमूर्तीपुढे व्यक्त केली.

मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावल्यानंतर त्यांना व्हीव्हीपॅट मशिनमधून मतदान केल्याची खात्री होणारी पावती दिली जाऊ शकते का, अशी विचारणा न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी केली. मतदारांना व्हीव्हीपॅट स्लिप दिल्यास त्याचा गैरवापर होण्याची भीती ॲड. मनिंदरसिंह यांनी व्यक्त केली. या पावतीचा गैरवापर दुसरे लोक कसे करतील, हे आम्ही सांगू शकत नाही. मात्र पावती दिल्यास मतांच्या गोपनीयतेचा भंग होईल, असेही ॲड. मनिंदर सिंह यांनी स्पष्ट केले. या मुद्द्यावर न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला.

# कर्जतमधील सात गावांना वादळी वाऱ्याचा तडाखा


## फळबागा भुईसपाट । सत्तर हेक्टर क्षेत्रातील फळबागांचे नुकसान

● **कर्जत । वीरभूमी –** बुधवारी सायंकाळी उशीरा कर्जत तालुक्यात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. यामध्ये सात गावातील फळबागांना मोठा फटका बसला. नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे तातडीने करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी तसेच कामगार तलाठी यांनी पंचनामे केले. सात गावात सुमारे ७० हेक्टर क्षेत्रातील फळबागांचे नुकसान झाले आहे.

बुधवारी सायंकाळी कर्जत तालुक्यातील आंबिकळणाव, खातगांव, माळंगी, लोणी मसदपूर, पाटेवाडी, देशमुखवाडी, रवळगांव या गावांना वादळी वाऱ्याचा तडाखा बसला. नुकसान झालेल्या फळबागांचे आज कृषी विभाग व महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी पाहणी करून पंचनामे केले. सात गावात सुमारे सत्ता हेक्टर क्षेत्रातील फळबागांचे ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान झाले आहे, असा प्राथमिक अंदाज आहे. नुकसान







झालेल्या फळबागांत केळी, आंबा, डाळिंब, लिंबू या फळबागांचा समावेश आहे.

वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. यामुळे शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान झाले, याची माहिती मिळताच कर्जतचे तहसीलदार गुरु बिराजदार तसेच कर्जत तालुका कृषी अधिकारी पद्मनाथ म्हस्के यांनी संबंधित गावांतील अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार सर्व फळबागांचे पंचनामे करण्यात आले. याबद्दल शेतकरी वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे. कर्जत तालुका कृषी अधिकारी पद्मनाथ म्हस्के यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह खातगांव शिवारातील केळी उत्पादक शेतकरी एकनाथ आजीनाथ अनारसे यांच्या केळीच्या बागेला भेट देऊन पाहणी केली. यावेळी कृषी सहायक अशोक आटोळे, विठ्ठल शेळके, कामगार तलाठी गणेश सोनवणे आदी उपस्थित होते.

तर जामखेड तालुक्यात वीज पडून काही जनावरंही दगावली आहेत. याबाबत प्रशासनाने तातडीने पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी. तसंच गेल्या महिन्यात ३० मार्च रोजी जामखेड तालुक्यात झालेल्या वादळी पावसामुळं झालेल्या नुकसानीचीही भरपाई द्यावी, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

## हिवरगाव पावसा येथे शेततळ्यात बुडून दोन सख्ख्या भावांचा मृत्यू

● **संगमनेर । वीरभूमी –** तालुक्यातील हिवरगाव पावसा येथे निळवंडे कालव्याच्या कडेला खेळण्यासाठी गेलेल्या दोन सख्ख्या भावांचा शेततळ्यात पडून बुडाल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी चारच्या सुमारास घडली. रितेश सारंगधर पावसे (वय १२) व प्रणव सारंगधर पावसे (वय ८, दोघेही रा. हिवरगाव पावसा, ता. संगमनेर) अशी त्यांची नावे आहेत.

एक वर्षांपूर्वीच त्यांच्या वडिलांचे छत्र हरपले होते. रामनवमीनिमित्त शाळेला सुट्टी होती. त्यामुळे ते दुपारी जेवण करून सायकलवरून खेळण्यासाठी घरापासून काही अंतरावरील निळवंडे कालव्याच्या शेजारी राहणाऱ्या नातेवाईकाकडे गेले होते. ते खेळता खेळता एका शेततळ्याजवळ आले. या दरम्यान पाय घसरुन ते शेततळ्यात पडले असावेत. शेततळ्यात पाणी असल्याने ते बुडाले. काही लोकांना तरंगणाऱ्या चपला दिसल्याने, त्यांना काहीतरी अघटित घडल्याची शंका आली. शर्थीच्या प्रयत्नानंतर

एक मृतदेह बाहेर काढला. मात्र दुसरा मृतदेह शोधण्यासाठी पाणबुड्याला बोलवावे लागले. दोघाही मुलांना बेशुध्दावस्थेत सायंकाळी सहाच्या सुमारास तात्काळ घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. मात्र ते दोघेही औषधोपचारापूर्वीच मयत झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले.

त्यांच्या खबरीनुसार संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक देविदास दुमणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक सचिन उगले करीत आहेत.

वीरभूमी

# SPOT NEWS

## कब्रस्तानला जागा देण्याच्या वादातून तरुणाला मारहाण

● **नगर । वीरभूमी –**

कब्रस्तानला जागा देण्याच्या वादातून चौघांनी तरुणाला मारहाण करून जखमी केले. चाँद शाबीर पठाण (वय ३५ रा. जांब कौंडगाव ता. नगर) असे जखमी तरूणाचे नाव आहे. त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू असताना त्यांनी दिलेल्या जबाबावरून नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. समीर वजीर पठाण, असीफ वजीर पठाण, वसीम वजीर पठाण, बशीर वजीर पठाण (सर्व रा. जांब कौंडगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. रविवारी (दि. १४) जांब कौंडगाव येथे ही घटना घडली. गावातील नागरिक व चाँद पठाण असे सर्वजण मिळून समीर पठाण याच्यासोबत गावातील कब्रस्तानात बोलत होते. त्यावेळी चाँद त्याला म्हणाले,'शेतगट नंबर ३६ हा आपल्या दोघांचा सामाईक असून त्या शेजारी आपण कब्रस्तानला जागा देऊ' त्यावर समीर म्हणाला,'ती जागा आमची आहे, तेथे कब्रस्तान करायचे नाही', त्यानंतर गावातील नागरिक व फिर्यादी चाँद हे समीरला समजून सांगत असताना त्याला राग आला. त्याने चाँद यांना शिवीगाळ दमदाटी करून मारहाण केली. इतर तिघांनी पाण्याच्या पाईपने मारहाण करून जखमी केले. 'तू जर परत आमच्या नादी लागला तर तुला जिवे ठार मारून टाकू' अशी धमकी देऊन शिवीगाळ, दमदाटी केली. जखमी चाँद यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबावरून चौघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## भविष्यातील नगरच्या विकासाच्या नवनवीन संकल्पनांच्या मंथनास प्रारंभ

● **नगर । वीरभूमी –**

लोकसभा, विधानसभा किंवा महानगरपालिका निवडणूक आल्यावर सर्वच राजकीय पक्ष किंवा उमेदवार स्वतः तयार केलेला विकासाचा अजेंडा जाहीर करत असतात. मात्र मतदार संघातील सामान्य जनतेच्या मनात कोणती कामे व कसा विकास अपेक्षित आहे हे विचारात घेतले जात नाही. यासाठी सर्वसामान्य जनतेच्या विकासाच्या अपेक्षा काय आहेत? त्यांना भेडसावणारे प्रश्न समस्यांना वाचा फुटावी तसेच विकासाच्या नवनवीन संकल्पना मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे या उद्देशाने समाज प्रबोधनासाठी काम करणाऱ्या नगरच्या विचार भारतीच्या वतीने जन संवाद हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. भविष्यातील नगरच्या विकासाच्या नवनवीन संकल्पनांच्या मंथनास प्रारंभ झाला असून विचार भारतीच्या या जन संवाद उपक्रमास सर्वच क्षेत्रातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जन संवाद उपक्रमा अंतर्गत एमआयडीसी मधील कारखानदार व उद्योजकांची बैठक मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, मराठा चेम्बर ऑफ कॉमर्सचे उपध्यक्ष प्रकाश गांधी, विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी, उद्योजक आनंत देसाई, विनायक देशमुख आदींसह मोठ्या संख्यने एमआयडीसी मधील कारखानदार व उद्योजक उपस्थित होते. या बैठकीत उपस्थितांनी एमआयडीसीच्या विकासासाठी नव्या संकल्पना मांडण्या बरोबरच अनेक प्रलंबित समस्याही मांडल्या. यावेळी प्रकाश गांधी, प्रमोद मोहळे, हरजितसिंग वधवा, बलभीम पठारे आदींनी विविध सूचना व संकल्पना मांडल्या. रविंद्र मुळे यांनी जन संवाद अभियानाची माहिती दिली. सचिव सुधीर लांडगे यांनी आभार मानले. उपाध्यक्ष अनिल मोहिते यांनी सूत्रसंचालन केले.

# जनतेची आर्थिक लुबाडणूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

## फसवणूक करणाऱ्या शेअर्स ट्रेडर्सविरोधात चापडगावात गुंतवणूकदारांची बैठक

● **शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव तालुक्यात शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करून मोठ्या प्रमाणावर परताव्याचे आमिष दाखवून लुबाडणाऱ्या शेअर ट्रेडर्सरत गुन्हा दाखल करावा. ट्रेडिंगच्या नावाखाली नागरिकांकडून लाखो रुपये जमा करून पोबारा करणाऱ्या शेअर ट्रेडरधारकांमुळे अनेकांचे संसार उद्धुस्त झाले आहेत. त्यामुळे यासर्व पळून गेलेल्या ट्रेडर्सचा शोध घेऊन त्यांच्या विरुद्ध फसवणुकीचे गुन्हे दाखल करावेत अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा देण्यात आला.



मोठ्या परताव्याच्या आमिषाने अनेकांची शेअर ट्रेडरकडून आर्थिक फसवणूक झाली आहे. अशी फसवणूक झालेल्यांनी चापडगाव येथे विचार विनिमय करण्यात आलेल्या बैठकीत संबधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. या बैठकीच्या नियोजनासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे व संतोष गायकवाड यांनी पुढाकार घेतला.

चांगला परतावा मिळून देण्याच्या आमिषाने लोकांकडून पैसे घेऊन गुंतवणूक करणाऱ्या व त्यानंतर पळून गेलेल्या शेअर्स ट्रेडसचा शोध घेण्याची गरज गुंतवणूकदारांना वाटू लागली आहे. फसवणुकीमुळे नागरिकांचे धाबे दणाणले आहेत. आयुष्यभराची जमा केलेली पुंजी शेअर ट्रेडर्स धारकांच्या नादी लागून हिरावली गेल्याने आता पुढे काय? या भावनेने नागरिक हतबल झाले आहेत. गुंतवणुकदारांनी शेतीमाल विकून, बचत गटाचे व बँकेचे कर्ज घेऊन, सोनेतारण ठेवून तसेच मुदत ठेवीच्या पावत्या मोडून पैसे शेअर ट्रेडर्सच्या हवाली केले आहेत.

चापडगाव येथील बैठकीला गदेवाडी, बेलगाव, अंतरवाली, सोनविहीर, वरखेड, खामपिंपरी, प्रभूवाडगावसह इतर गावातील फसवणूक झालेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत अनेकांनी आपल्या व्यथा मांडत अश्रूंना मोकळी वाट करुन दिली.

दम्यान बैठकीत काही नागरिकांनी धनादेश, जमा पावत्या व अन्य पुरावे उपलब्ध असल्याचे सांगितले. यावेळी शेवगाव पोलिस ठाण्यात जाऊन रीतसर तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. येत्या दोन दिवसात सविस्तर निवेदन करून प्रातांधिकारी, तहसीलदार, शेवगाव उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक यांची गुंतवणूकदारांचे शिष्टमंडळ भेट घेणार आहे. या शेअर ट्रेडर्सवर गुन्हा दाखल न झाल्यास निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## टाकळी ढोकेश्वर येथे रामनवमी उत्साहात



● **टाकळी ढोकेश्वर । वीरभूमी –**

राम नवमी हिंदू धर्मातील महत्वाच्या सण आहे, ज्याला भारतात विशेषत: उत्तर भारतात साजरा केला जातो. हा त्या दिवशी हनुमान जन्माला पारितोषिकाने नामकरण केला जातो. राम नवमी हा श्रीरामाच्या जन्माच्या धार्मिक आणि सामाजिक महत्वाचा सण आहे, जो की चैत्र महिन्यातील नवमी दिवशी साजरा केला जातो. हा सण भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्वपूर्ण आहे. या दिवशी, भक्तांनी रामचंद्राच्या मंदिरांत जाऊन आराधना केली जाते आणि पुस्तके, रामायण कथांची वाचन केली जाते.

रामनवमीचे औचित्य साधून टाकळी ढोकेश्वर गावात भव्य दिव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. भारतीय संस्कृती, लोकसभ्यता आणि विविध सामाजिक विषयांवर प्रबोधन करणारी ही शोभायात्रा टाकळी ढोकेश्वरच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक वैभवात भर घालणारी ठरली.

सकाळी ठीक ९ वाजता हनुमान मूर्ती अभिषेक करून शोभयात्रा सुरू झाली. महात्मा फुले चौक (वासुंदा चौक)– बाजार तळ – हनुमान मंदिर– या मार्गांवर शोभयात्रा काढली होती. शोभयात्रेचे विशेष आकर्षण म्हणून लेझीम पथक धुमाळ वस्ती व धर्मनाथ लेझीम पथक निवडुंगेवाडी यांचे आयोजन केले होते. तसेच सनई पथक, फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली होती, त्यानंतर हनुमान मंदिरात सामूहिक हनुमान चालीसा पठण व आरती करण्यात आली, रामरक्षा पुस्तकाचे वाटप करण्यात आले, प्रसाद वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

हा सर्व कार्यक्रम हिंदवी प्रतिष्ठान व सकल हिंदु समाज, टाकळी ढोकेश्वर यांनी आयोजित केला होता.

## लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेची आज सांगता

### शरद पवार, बाळासाहेब थोरात, आदित्य ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती

● **नगर, पारनेर । वीरभूमी –**

अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार निलेश लंके यांनी दि. १ एप्रिल पासून मतदार संघात काढलेल्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेची सांगता शुक्रवारी दि. १९ एप्रिलला होत असून त्यानिमित्त दुपारी ४ वाजता ऐतिहासिक गांधी मैदानात जाहीर सभा होणार आहे. या सभेसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, माजी महसूल मंत्री आ. बाळासाहेब थोरात, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आ. आदित्य ठाकरे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. यावेळी जोरदार शक्तीप्रदर्शन करण्याची तयारी महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात येत आहे.



निलेश लंके यांची स्वाभिमान जनसंवाद यात्रा दि. १ एप्रिल पासून मोहटा देवी गडावरून सुरु झाली. १९ दिवस चाललेली ही यात्रा पाथर्डी, शेवगाव, राहुरी, कर्जत, जामखेड, श्रीगोंदा, पारनेर या तालुक्यांमधून नगर शहरात आलेली आहे. या यात्रेचा मुक्काम कधी मंदिरात, कधी एखाद्या मंगल कार्यालयात असा सुरु होता. या दरम्यान निलेश लंके हे ही सर्वसामान्य कार्यकर्त्यांसमवेतच जेथे जागा उपलब्ध होईल तेथे मुक्काम करत होते. संपूर्ण राज्यभर या यात्रेची जोरदार चर्चा सुरु आहे. यात्रेदरम्यान सर्वसामान्यांचे प्रश्न त्या त्या भागातील अडीअडचणी लंके यांनी समजून घेत जनतेशी आपुलकीने संवाद साधला आहे.

बुधवार पासून ही यात्रा नगर शहरात सुरु आहे. शहरातील विविध प्रभागात ही यात्रा जात असून ठिकठिकाणी चौक सभा घेतल्या जात आहेत. या यात्रेत शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी, आप सह आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यामध्ये उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचे पाहायला मिळाले. तसेच शहरातील नागरिकांनीही या यात्रेचे जोरदार स्वागत केले आहे.

शुक्रवारी होणाऱ्या सांगता सभेसाठी नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या धोरणामुळेच

# कृषी आणि सहकार क्षेत्राला आत्मनिर्भर होण्याची संधी

## जिल्हा बँकेचे संचालक अंबादास पिसाळ यांचा विश्वास

● **नगर । वीरभूमी –**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने देशातील शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेवून योजनांची अंमलबजावणी केली. दहा वर्षांच्या काळात कृषी आणि सहकार क्षेत्राला आत्मनिर्भर बनविण्याचे काम केंद्र सरकारच्या माध्यमातून झाले असल्याचे प्रतिपादन जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अंबादास पिसाळ यांनी केले.

या संदर्भात बोलताना पिसाळ म्हणाले की, मागील दहा वर्षात कृषी क्षेत्रासाठी झालेल्या प्रत्येक निर्णयाचा लाभ शेतकऱ्यांना झाला आहे. किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये देण्याचा निर्णय झाला. मागील पाच वर्षे ही योजना अखंडीत सुरु आहे. या बरोबरीनेच खतांच्या किंमती कमी करण्यासाठी केंद्र सरकारने अनुदानाची उपलब्धता करुन दिली. त्यामुळे खताचे भाव स्थिर राहीले. नॅनो युरीयाचे उतपादन करून शेतकऱ्यांना अर्थिक दिलासा दिला आहे. शेती विषयक ज्ञान शेतकऱ्यांना एकाच छत्राखाली मिळावे यासाठी किसान समृध्दी केंद्रांची स्थापना करण्यात आल्याचेही पिसाळ म्हणाले.

सहकार मंत्रालय स्थापन करुन, केंद्र सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला. हे मंत्रालय सुरु झाल्यानंतर सहकारी साखर कारखान्यांवर वर्षानुवर्षे लादण्यात आलेला आयकराचा बोजा कमी करण्याचा निर्णय करुन, केंद्र सरकारने साखर कारखान्यांना दिला. यापुर्वी अनेक वर्ष सतेत राहूनही काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना याबाबतचा निर्णय करता आला नाही. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी घेतलेल्या निर्णयाचा प्रत्यक्ष लाभ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होणार असून, केंद्र सरकारने ऊसाच्या हमीभावातही सातत्याने वाढ केली. इथेनॉल निर्मितीला प्राधान्य देवून साखर धंद्याला संरक्षण देण्याचे काम केंद्र सरकारकडून झाले असल्याचे पिसाळ यांनी सांगितले.



ग्रामीण भागाच्या अर्थकारणाला सहाय्यभूत ठरणाऱ्या प्राथमिक सोसायट्यांना सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून आता नवी ओळख निर्माण करुन देण्याचे काम होत असून, आता सोसायट्यांना अर्थिक बळकटी देण्यासाठी १७० विविध प्रकारचे उद्योग करण्याची मुभा देण्यात आली असून, धान्य गोदामांची उभारणी करण्यासाठीही प्राथमिक सोसायट्यांना सहकार्य करण्याची भूमिका केंद्र सरकारची राहणार असल्याने याचा लाभ शेतकऱ्यांना भविष्यात होईल असा विश्वास यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षाच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या संकल्प पत्रातूनही कृषी क्षेत्राला दिलासा देण्याची ग्वाही देण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रमुख पीकांकरीता हमीभावाची शाश्वती देताना अन्य २२ उत्पादीत पिकांनाही हमीभाव देण्याबाबत केंद्र सरकारने विचार केला आहे. डाळ आणि तेल उत्पादनात देशाला आत्मनिर्भर करताना कडधान्याच्या उत्पादनाला पाठबळ देवून, हे कडधान्य विश्व सुपर फुड म्हणून आता कसे ओळखले जाईल यावरही भारतीय जनता पक्षाने लक्ष केंद्रीत केले असल्याचे पिसाळ यांनी सांगितले.

शेतकरी आणि सहकार क्षेत्राला पाठबळ देण्यासाठी केंद्र व राज्य नेहमीच सकारात्मक राहीले आहे. राज्य सरकारने सुरू केलेल्या पीक विमा योजना तसेच दूध उत्पादकांना पाच रुपयांचे अनुदान थेट बँक खात्यात वर्ग करून दिलासा दिला असल्याकडे अंबादास पिसाळ यांनी लक्ष वेधले.

## भगवान महावीर जयंतीदिनी रविवारी आनंदधाम येथे भक्ती संध्या कार्यक्रम

● **नगर । वीरभूमी –**

संपूर्ण जगाला अहिंसा व शांतीचा संदेश देणाऱ्या भगवान महावीर स्वामींची जयंती रविवार दि.२१ एप्रिल २०२४ रोजी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त आनंदधामच्या पवित्र प्रांगणात प्रबुद्ध विचारक पूज्य आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेतून जैन सोशल फेडरेशनच्या वतीने सायंकाळी सात वाजता भक्ती संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. इंदौर येथील सुप्रसिध्द गायिका सृष्टी जगताप व डॉ.श्रद्धा जगताप या कार्यक्रमात सुरेल भक्ती गीते, भजने, भावगीते सादर करतील.

डॉ. श्रद्धा व सृष्टी जगताप ही आई व मुलीची जोडी संगीत क्षेत्रात नावाजली जाते. डॉ. श्रद्धा जगताप या मागील ३० वर्षांपासून संगीत क्षेत्रात योगदान देत आहेत. त्यांनी संगिताचे प्राथमिक शिक्षण इंदौर येथे ग्वाल्हेर घराण्याचे पंडीत सुनील मसूरकर यांच्याकडे घेतले. ७ वर्षांपासून त्या मुंबईत शाल्मली जोशी यांच्याकडे शिकत आहेत. त्यांनी शास्त्रीय संगीतात एम.ए., एमफील तसेच पीएचडी केली आहे. गंधर्व महाविद्यालयातून त्यांनी विशारद पदवीही प्राप्त केली आहे. सारेगामा, सरगम, मेरी आवाज़ सुनो, गौरव महाराष्ट्राचा, सुरसंगम या दूरचित्रवाणी वाहिन्यांवर त्यांच्या गाण्यांना अनेक दिग्गज संगीतकारांनी दाद दिली आहे. संगीतकार नौशाद, खैयाम, रविंद्र जैन, सुरेश वाडकर, भूपेंद्र मिताली, चंदनदास, श्रीधर फड़के अशा अनेक दिग्गजांनी त्यांना आशीर्वाद दिले. राजस्थानी, बुंदेलखंडी मराठी, गुजराती, भोजपुरी चित्रपटात त्यांनी गीते गायली आहेत. सूर श्री, कलाश्री, सूरमनी, लता मंगेशकर अलंकरण, इंदौर की सुरीली बेटी, दीवा ऑफ इंदौर, महारथी सन्मान अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना वेळोवेळी गौरविण्यात आले आहे. सृष्टी जगताप या सुद्धा आईच्या मार्गदर्शनाखाली सुरेल गायन करतात. मागील वर्षी त्यांनी आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त नगरला भक्ती संध्या कार्यक्रमात सहभाग घेतला होता.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## ढवळपुरी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**पारनेर । वीरभूमी –**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वभूषण, महामानव, बोधीसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे आचारसंहिता नियमाचे पालन करून भव्य जयंती साजरी करण्यात आली. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने सर्व नियमांचे पालन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मिरवणूक शांततेत पार पाडली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल तसेच जीवनाबद्दल आण्णासाहेब गायकवाड यांनी माहिती दिली. बाबासाहेबांनी आपले संपूर्ण जीवन देशातील गरीब, दुर्बल व दुर्लक्षित समाजासाठीच वाहिले यासाठी त्यांना अनेक हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्याची माहिती दिली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच नंदाताई गावडे व समस्त ग्रामस्थ ढवळपुरी माता भगिनी, नियोजन समिती अध्यक्ष अमोल सातपुते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मित्र मंडळ अध्यक्ष तुषार साळवे, संस्थापक संतोष मधुकर साळवे, राहुल भालेराव, ग्रामपंचायत सदस्य रमेश केदारी, शंकर भालेराव, हिरामण भालेराव, काळू साठे, विकास साठे, ऋतिक साळवे, ऋषिकेश दळवी, गोल्या साळवे, गौरव साळवे, भैय्या साळवे, शंकर साळवे, किरण भालेराव, संतोष साळवे, विजय साळवे, किरण केदारी, सुनील राजापुरे, कमलेश कसबे, अथर्व जाधव, भैय्या नेटके, यश मोरे, सुभाष शिंदे, रवी भालेराव, सर्व युवकांनी शांततेने जयंती साजरी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## पिंपळगाव माळवी येथे श्रीराम नवमी उत्साहात साजरी



**नगर । वीरभूमी –**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील श्रीराम नवमी उत्सव पंचक्रोशीत प्रसिद्ध असून मागील सात दिवसापासून अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. बुधवार दि. १७ रोजी श्रीराम नवमी निमित्त हभप. पोपट महाराज यावलकर यांचे श्रीराम जन्माचे सुश्राव्य कीर्तन झाले. सकाळी भाविकांनी आणलेल्या गंगाजलाने श्रीराम मूर्तीस जलाभिषेक करण्यात आला. आजच्या श्रीराम नवमीच्या सोहळ्यास पंचक्रोशीतील सात हजार भाविक उपस्थित होते. ठीक बारा वाजता श्रीरामांना पाळण्यात टाकून श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. श्रीराम मंदिर व परिसरात पुष्पवृष्टी, फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली व श्रीराम मंदिर परिसर श्रीरामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला. यावेळी प्रभू श्री रामाचा पाळणा व उपस्थित भावीकांनी सामुदायिक भजन गायन केले. पिंपळगाव माळवी येथील पुरातन श्रीरामाचे मंदिर पंचक्रोशीतील एक आध्यात्मिक केंद्र म्हणून उदयास आले आहे. सकाळपासूनच परिसरातील भाविकांनी श्रीराम मंदिरात दर्शनास गर्दी केली होती. सायंकाळी श्रीराम पादुकांचे पारंपारिक पद्धतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली.

# येळी गावात भरदिवसा घरफोडी; एकाला पकडले

### ७२ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास । पकडलेल्या चोरट्याला ग्रामस्थांकडून चोप

**पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यातील येळी गावात भर दुपारी किशोर श्रीधर कराड यांच्या घराचे कुलुप तोडुन घरातील कपाटातुन ५७ हजार ५०० रुपये रोख, तीन ग्रॅम सोन्याचे कानातील कर्णफुले असा ७२ हजार ५०० रुपयाचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. चोरट्यांपैकी सहाजण पळाले मात्र एकाला पाठलाग करुन किशोर कराड यांनी नागरीकांच्या मदतीने पकडले आहे.

गुरुवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास येळी गावात विद्यालयाच्या जवळ ही घटना घडली. चोर पकडल्याची बातमी गावात पसरताच सुमारे पाचशे ग्रामस्थांनी गर्दी केली होती. पकडलेल्या चोरट्याला नागरीकांनी चांगलाच चोप दिला. किशोर कराड यांनी चोरट्याला नागरीकांच्या तावडीतुन सोडवुन घरात कोंडुन ठेवले. संतप्त नागरीकांनी पोलिसांकडुन चोरटे पकडण्याचे आश्वासन घेतले व चोरटा पोलिसांच्या ताब्यात दिला.

येळी गावातील किशोर श्रीधर कराड हे आई, वडील, पत्नी व मुलगा असे घरात राहतात. फोटोग्राफी व शुटींगचा व्यवसाय करतात. गावातील व नातेवाईकाचे लग्न असल्याने ते कुंटुबासमवेत लग्नाला गेले होते. त्यांच्या कॅमेऱ्याची बॅटरी घरी विसरली होती ती आणण्यासाठी दीड वाजण्याच्या सुमारास कराड परत घरी आले असता घराचा दरवाजा कटावनीने तोडल्याचे दिसले. घरात प्रवेश करताच पाच ते सहा जण घरातुन पळाले. एक जण घरातच मागील बाजुला लपलेला दिसला. त्याचा पाठलाग केला तर त्याने कुंपनावरुन उडी मारुन तो पळाला. किशोर यांनी त्याचा पाठलाग केला व समोरुन रस्त्याने येणारे मुलांनी चोरट्याला अडविले. त्यावेळी नागरीकांचा जमाव जमला. चोरट्याला काही लोकांनी चांगलेच चोपले. किशोर कराड यांनी चोरट्याला घरात कोंडुन घेतले तेव्हा तो वाचला. त्यानंतर पोलिसांना फोन केले. दोघेजण पोलिस घटनास्थळी गेले. तेथे नागरीकांनी पोलिसांना चांगलेच धारेवर धरले. चोरटा पकडला असे सांगुनही पोलिसांना येळी गावात यायला दोन तास लागले. संतप्त नागरीकांनी पोलिस नाईक भाऊसाहेब खेडकर यांना जाब विचारला. त्यांनतर पोलिस कर्मचारी कळमकर, केकाण व मनिषा ढाणे हे पोलिस गाडीतुन आले. पोलिसांनी लेखी द्यावे नंतरच संशयीत आरोपी ताब्यात देवू असा ग्रामस्थांनी आग्रह धरला. भाऊसाहेब खेडकर यांनी नागरीकांना आरोपींना तातडीने अटक करु. रोज या भागात रात्रीची गस्त घातली जाईल असे आश्वासन दिले. त्यानंतर येळी गावचे सरपंच संजय बडे, अनिलराव फुंदे, येळीचे ग्रामस्थ व किशोर कराड पोलिस ठाण्यात आले. तेथे फिर्याद देण्याचे काम रात्री उशीरापर्यंत चालु होते.



भरदिवसा दरोडा पडत असेल तर रात्रीच्या वेळी काय होईल, अशी भिती नागरीकांच्या मनात तयार झाली आहे. पोलिसांनी यातील आरोपींचा शोध घेवुन तातडीने गुन्ह्याचा तपास करावा. अन्यथा येळी ग्रामस्थ रास्तारोको आंदोलन करतील असा इशारा संजय बडे यांनी दिला आहे.

### पोलिसांसमोर तपासाचे आव्हान

पकडलेला संशयीत हा अल्पवयीन असल्याचे समजते. शिवाय पकडलेला आरोपी हा त्याचे नाव गाव देखील सांगायला तयार नव्हता. त्याची वैद्यकीय तपासणी करुन त्याला पोलिस ठाण्यात आणले होते. संशयीत हा सराईत असावा. त्याने चार ते पाच वेगवेगळे नावे पोलिसांना सांगितले आहेत. पोलिस त्याची ओळख पटविण्याचे काम करीत होते. चोरट्यांची ओळख पटविणे, त्याच्या सोबत असणाऱ्याची नावे निष्पन्न करणे हे आता पोलिसांसमोर आवाहन आहे.

## महापुरुषांचे विचार आचरणात आणावेत : डॉ. महादेव जरे




**श्रीगोंदा । वीरभूमी –**

महापुरुषांचे कार्य प्रेरणादायी असते, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श ठेवून समाजाने, त्यांचे विचार आचरणात आणावेत, असे प्रतिपादन महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी केले.

महात्मा जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्तजयंती उत्सवाप्रसंगी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व समान संधी केंद्राच्या वतीने फुले आंबेडकरी विचारधारा आणि वर्तमान स्थिती या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना ते बोलत होते. प्रो. डॉ. राजाराम कानडे, प्रा. डॉ. राहुल गायकवाड, प्रा. अनिल ढवळे, प्रा. उषा बोराडे प्रा. संजय अहिवळे यांनी परिसंवादामध्ये भाग घेऊन महापुरुषांची विचार विविध क्षेत्रांमध्ये आज कसे महत्त्वाचे आहेत. यावर आपल्या मंथनातून विचार व्यक्त केले.

यावेळी डॉ. राजेंद्र ठाकरे, डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. सुप्रिया पवार, डॉ. रावसाहेब काळे, डॉ. नितीन थोरात, प्रा. शहाजी मखरे, ग्रंथपाल प्रा. यशोदा लबडे, कार्यालय प्रमुख बाळासाहेब राऊत उपस्थित होते.

प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतीराव फुले यांच्या प्रतिमा पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. अनंत सोनवणे यांनी मान्यवरांचा स्वागत, परिचय व सूत्र संचालन केले. शेवटी डॉ. हरिभाऊ वाघीरे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील अध्यापक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## अकोलेत रामनवमीनिमित्त भव्य मिरवणुका

**अकोले । वीरभूमी –**

माजी आमदार वैभवराव पिचड मित्र मंडळ, बजरंग दल व मनसेच्या वतीने काल अकोले शहरात प्रभू श्रीराम नवमी निमित्त आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रम, माजी आमदारांनी डी. जे. च्या तालावर धरलेला ठेका, भव्य मिरवणुका या अकोलेकरांचे विशेष आकर्षण ठरल्या.

रामनवमी निमित्ताने अकोले शहरातून रस्त्यावर ठिकठिकाणी सादर झालेले महाकाल तांडव नृत्य, महाबली हनुमानाची प्रतिकृती हे मिरवणुकीतील विशेष आकर्षण ठरले. शहरात ठीक ठिकाणी कार्यक्रम पहाण्यासाठी अकोलेकरांनी मोठी गर्दी केली होती.

यावेळी भाजप पक्ष कार्यालयासमोर भव्यदिव्य श्रीराम मूर्ती व आकर्षक विद्युत रोषणाई केलेले रंगमंच उभारण्यात आलेला होता. यावेळी माजी आ. वैभवराव पिचड व खा. सदाशिव लोखंडे यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाची आरती करण्यात आली. त्या नंतर भाजप पक्ष कार्यालया पासून डी जे तालावर भव्य दिव्य मिरवणुक काढण्यात आली. यावेळी डीजेच्या तालावर माजी आमदार वैभवराव पिचड यांनी आपल्या कार्यकर्त्यासमवेत व राम भक्तांसमवेत नृत्याचा ठेका धरला होता. या मिरवणुकीत महाकाल तांडव नृत्याने अकोलेकरांना मंत्र मुग्ध केले. महाबली हनुमानाने सर्वांचे लक्ष वेधले. रामनवमी उत्सव पहण्यासाठी अकोलेकरांनी तोबा गर्दी केली होती.

मनसेचे तालुका प्रमुख दत्ता नवले यांच्या नेतृत्वाखाली बसस्थानक परिसरात रामनवमी निमित्त कार्यक्रम आयोजित केला होता. याशिवाय शहरासह तालुक्यात विविध ठिकाणी रामनवमी निमित्त श्रीराम मंदिरात भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.



यावेळी माजी आमदार वैभवराव पिचड, खा. सदाशिवराव लोखंडे, ज्येष्ठ नेते शिवाजीराव धुमाळ, जिल्हा सरचिटणीस सीताराम भांगरे, शिवसेना (शिंदे गट) जिल्हा संपर्क प्रमुख बाजीराव दराडे, भाजप ज्येष्ठ नेते गिरजाजी जाधव, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, अमृतसागर दूध संघाचे उपाध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, भाजपा तालुकाध्यक्ष यशवंतराव आभाळे, सरचिटणीस राहुल देशमुख, मच्छिंद्र मंडलिक, सचिन जोशी, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख, खजिनदार धनंजय संत, बजरंग दलाचे नेते भाऊसाहेब चव्हाण, भाजप महिला तालुकाध्यक्षा वैष्णवी धुमाळ, शहराध्यक्ष अंजली सोमणी, माजी नगराध्यक्ष सोनाली नाईकवाडी, उपनगराध्यक्ष शरद नवले, नगरसेवक सागर चौधरी, विजय पवार, हितेश कुंभार, नगरसेविका शितल वैद्य, प्रतिभा मनकर, कविता शेळके, जनाबाई मोहिते, माधुरी शेणकर, अमृतसागरचे संचालक आनंदराव वाकचौरे, अप्पासाहेब आवारी, दयानंद वैद्य, बाजार समितीचे संचालक बाळासाहेब सावंत, मारुती वैद्य, ज्येष्ठ नेते प्रकाश नवले, माणिक देशमुख, परशराम शेळके, अमोल वैद्य, बबलू धुमाळ, नवनाथ मोहिते, महेश माळवे, ऋषी देशमुख, विजय देशमुख, मोसिन शेख, रवींद्र शेणकर, माधव भोर, प्रतिक वाकचौरे, सचिन उगले, शिवसेना शिंदे गटाचे तालुकाध्यक्ष संजय वाकचौरे, शहर प्रमुख गणेश कानवडे, युवा सेना जिल्हा प्रमुख महेश देशमुख, अनिल नाईकवाडी, सोमदास पवार, कैलास शेळके, प्रकाश पाचपुते, दिलीप हासे आदी उपस्थित होते.

# संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने साईभक्तांना सुगंधी दूध वाटप

### श्रीराम नवमीनिमित्त विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

**कोपरगाव । वीरभूमी –**

प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जन्मोत्सवानिमीत्त शिर्डीच्या साईबाबांच्या दर्शनाला पायी जाणाऱ्या साईभक्तांना युवा नेते श्री.विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव-शिर्डी रस्त्यावर समृद्धी उड्डाणपूलाखाली सुगंधी दूध वाटप करण्यात आले.

युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी युवा प्रतिष्ठान अनेक सामाजिक कार्य करत आहे. यामध्ये दरवर्षी सर्व धर्मिय सामुदायिक सोहळ्याचे दिव्य असे आयोजन करण्यात येते. यंदाही आयोजन करण्यात आले आहे. पूरग्रस्तांना मदत असो, थोर पुरुषांच्या जयंती, पुण्यस्मरणा निमीत्त व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. गड किल्ल्यांचे स्वच्छता अभियान असे सामाजिक कार्य या संस्थेच्या वतीने करण्यात येते. विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या युवकांचे संघटन असल्याने संजीवनी युवा प्रतिष्ठान या संस्थेचा नावलौकिक उल्लेखनीय ठरतो आहे.

श्रीराम जन्मोत्सव आणि शिर्डीचे साईबाबा यांची एक आध्यत्मिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. याच धारणेतून दरवर्षी हजारोभक्त रामनवमी निमीत्त साईबाबांच्या दर्शनाला जात असतात. त्यामुळे येवला, मनमाड, वैजापूर, कोपरगाव, जेऊर कुंभारी, धारणगाव आदी गावातील पालख्या व पायी साईभक्त शिर्डीच्या दिशेने जात असतांना समृद्धीच्या उड्डाण पुलाखाली युवा नेते विवेक भैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सुगंधी दूध वाटप करण्यात आले. यावेळी श्री. कोल्हे यांनी पालखी सोहळ्यात सहभाग घेतला. साई नामाचा जयघोष करीत नाचण्याचा आनंद घेतला. त्यानंतर भाविकांनी या भागात जी अस्वच्छता केली होती. ती स्वच्छता प्रतिष्ठानच्या वतीने विवेकभैय्या कोल्हे यांनी जातीने लक्ष घालून परिसर स्वच्छ केला.



या प्रसंगी बाळासाहेब पानगव्हाणे, अमोल गवळी, सिद्धार्थ साठे, सतीश आव्हाड, रवी रोहमारे, रामदास गायकवाड, प्रसाद आढाव, रोहित कणगरे, स्वप्नील कडू, सागर राऊत, सचिन सावंत, जयप्रकाश आव्हाड, गोपीनाथ गायकवाड, कृष्णकांत गवळी, संतोष गवळी, धनंजय माळी, दत्तू नाना संवत्सरकर, रुपेश सिनगर, रविंद्र लचुरे, कुणाल आमले, अनिल जाधव, सोमनाथ वाळुंज, सतीश निकम, समाधान कुर्हे, स्वराज सूर्यवंशी, भैय्या नागरे, वैभव सोळसे, मंगेश पवार, राहुल माळी, विक्की परदेशी, अमोल बागुल, ऋषिकेश निकम, तुषार मवाळ आदींसह पदाधिकारी व साईभक्त उपस्थित होते.

### भक्तांच्या आरोग्यासाठी फिरता दवाखाना उपलब्ध

कोपरगांव-शिर्डी रस्त्याचे काम सुरू असून रस्त्याची एकच बाजू वाहतुकीसाठी खुली होती. रस्त्यांवर वाहनाची गर्दी होती. त्यात पदयात्री पायी चालतांना कोणालाही कुठलाही त्रास झाल्यास संजीवनी प्रतिष्ठानच्या वतीने फिरता दवाखाना उपलब्ध करून देण्यात आला होता. या दवाखान्याचा भाविक लाभ घेत होते, तर भाविकांना अत्यावश्यक सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतूने रुग्णवाहिकाही प्रतिष्ठानच्या वतीने सेवेत ठेवण्यात आली होती.

# पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्माण करणार

## डॉ. सुजय विखे पाटील यांची ग्वाही । जिल्ह्यातील पर्यटन विकासाला गती देणार

**● नगर । वीरभूमी –**

नगर जिल्ह्याला ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा आहे. ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळांची परंपरा पर्यटन विकासाच्या माध्यमातून विकसित करून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आपण निश्चित पाठपुरावा करू, आशी ग्वाही महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.



डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. गावोगावी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यातून त्यांनी मतदार संघातील विकासाच्या संकल्पना मांडून देशात भारतीय जनता पक्षाचे सरकार येणार असल्याने जिल्ह्याच्या विकासाला मोठे पाठबळ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, जिल्ह्यात भव्य किल्ल्यांपासून ते ऐतिहासिक वारसा असलेली तिर्थक्षेत्र आहेत. प्रत्येक तालुका एका तिर्थक्षेत्राची ओळख म्हणून नावलौकीक मिळून आहे. यातून जिल्ह्याचे धार्मिक महत्त्व अधोरेखित होते. जिल्ह्यातील पर्यटनाला असलेल्या संधी विचारात घेवून जिल्ह्याचा पर्यटन विकासाला गती देण्यासाठी पाठपुरवा करणार असल्याचे डॉ. विखे म्हणाले.

रेहेकुरी येथेही अभयारण्य घोषित करण्यात आले असून ते काळविटांसाठी राखीव आहे. अशी अनेक स्थळे आहेत जी पर्यटकांना आकर्षित करू शकतात. यामुळे पर्यटन विकास झाल्यास त्याच्या माध्यमातून स्थानिकांच्या रोजगाराचा प्रश्न सुटणार आहे. यामुळे प्रामुख्याने पर्यटन विकास हा आपल्या अजेंड्यावरील प्रमुख विषय राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणुकांचा प्रचार दुसऱ्या टप्प्यात असून सुजय विखे पाटील हे आपण केलेल्या विकासकामांच्या जोरावर मतदारांना साथ देण्याचे आवाहन करत आहेत. त्याच बरोबर ही देशाचे नेतृत्व ठरविणारी निवडणुक असून देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्या शिवाय पर्याय नसल्याचे सुद्धा त्यांनी यावेळी सांगितले.

मागील पाच वर्षात मतदारसंघाच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विकास कामे मार्गी लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला. युवकांच्या रोजगारा करीता श्रीगोंदा तालुक्यातील वडगाव गुप्ता येथील जमीन औद्योगिक वसाहती करीता देण्याचा निर्णय झाल्याने मोठे उद्योग मतदार संघात येण्यास तयार झाले असल्याचे खा. विखे यांनी सांगितले.

## नगर मनपाकडून मतदान जनजागृती संकल्प रथाचे उद्घाटन

**● नगर । वीरभूमी –**

महानगरपालिकेच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. मागील निवडणुकीमध्ये महापालिका हद्दीमध्ये ६०. २६% मतदान झाले होते. आता १००% मतदान करण्यासाठी विविध उपयोजना करण्यात येत असून आज महिला बचत गटाची बैठक संपन्न झाली असून सदस्यांमार्फत घरोघरी जाऊन नागरिकांमध्ये मतदान करण्यासाठी जनजागृती केली जाणार आहे. याचबरोबर शहरांमध्ये मतदान जनजागृती साठी संकल्प रथयात्रा सुरू करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त डॉ.पंकज जावळे यांनी दिली.

अहमदनगर महापालिकेच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिला बचत गटाच्या बैठकीत आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी मार्गदर्शन केले यावेळी उपायुक्त सपना वसावा, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजान, सुप्रिया घोगरे, निलेश शिंदे, नानासाहेब बेलेकर, आदीसह बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मनपाच्या वतीने लोकसभा निवडणुकीची पूर्वतयारी जोरदार तैयारी सुरू असून विविध संघटनेच्या माध्यमातून शहरांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी संकल्प रथयात्रा सुरू केले आहे. याचबरोबर ज्येष्ठ नागरिक व अपंगांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्यासाठी सोय केली आहे. त्याचबरोबर महिला बचत गटांना लोकशाही दूध ओळखपत्र देण्यात येणार असून त्यांच्यामार्फत घरोघरी जाऊन मतदान करण्याबाबत जनजागृती करण्यात येईल. आज महिला बचत गटातील सदस्यांना १००% मतदान करण्यासाठी शपथ दिली. अशी माहिती उपायुक्त सपना वसावा यांनी दिली.

## मोहटादेवी गड येथे वासंतीक नवरात्र उत्सवाची सांगता

**● पाथर्डी । वीरभूमी –**

श्री मोहटादेवी देवस्थान येथे वासंतीक नवरात्र उत्सवाची सांगता पारंपारिक उत्सवात व वेदमंत्राच्या जयघोषात झाली. राज्याच्या विविध भागातून हजारो भाविकांनी दिवसभरात भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. सप्तशती पाठांची पूर्णाहुती होम हवनाने झाली.



देवस्थानचे विश्वस्त तथा गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, रंजना कांबळे, विश्वस्त ॲड. विक्रम वाडेकर, पूजा वाडेकर यांचे शुभहस्ते देवीची महापूजा, होमहवन करून वेदमंत्राच्या घोषाने परिसर दुमदुमला. देवस्थानमार्फत वासंतीक, शारदीय व शाकंभरी अशी तीन नवरात्र साजरे होतात. विश्वशांती व संपूर्ण भारतवासी यांचे कल्याण व्हावे असा महासंकल्प करण्यात आला व विधिवत यज्ञविधी संपन्न झाला.

श्री मोहटादेवी व श्री प्रभू रामचंद्राची विश्व कल्याणार्थ प्रार्थना करून श्रीराम नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. उत्सवामध्ये रोज पारंपारिक उत्सव, त्रिकाळ आरत्या, सुवासिनी पूजन, कुमारिका पूजन, अन्नदान झाले.

औरंगाबाद, बीड, पुणे, नाशिक, कल्याण, मुंबई व राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीराम जन्म उत्सवानिमित्त हिंगणगाव येथील भाविक प्रा. छबन झावरे यांनी चिकुच्या फळाची आरस अर्पण केली. मंदिर व मंदिर परिसरातील योगिनी, दशमहाविद्या इ. देवतेस वर्धापन दिनानिमित्त अभिषेक, पुष्पहार, सवाद्य नैवेद्य अर्पण करून विधिवत पूजा सोहळा साजरा करण्यात आला.

यावेळी संस्थानचे विश्वस्त बाळासाहेब दहिफळे, जालना येथील उत्पादन शुल्क जिल्हा अधीक्षक श्री. नवलकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे, हीरालाल शर्मा, पापालाल लड्डा, ग्रामस्थ, भाविक भक्त व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी दिली.

नवरात्र महोत्सव होमहवनचे पौराहित्य वेदशास्त्र संपन्न नारायणदेवा खोकर मोहकर, महेश झेंड, विशाल पाटेगावकर, सुमित जोशी, भगवान जोशी, पुजारी भूषण साकरे, भास्कर देशपांडे आदीनी केले.

## विकासासाठी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सोबत या : ॲड. अभय आगरकर

**● नगर । वीरभूमी –**

जिल्ह्याच्या विकासासाठी लोकांनी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सोबत यावे, असे आवाहन नगर शहर भाजपा जिल्हा अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केले आहे. ते नगर येथील प्रचार सभेत बोलत होते. नगर जिल्ह्यात मागील १५ वर्षापासून प्रलंबित असेलेला उड्डाणपुलाचा विषय खासदार सुजय विखे पाटील यांनी मार्गी लावला. त्यामुळे त्यांच्याकडे जिल्ह्याच्या विकासाचे उद्दिष्ट स्पष्ट असून त्यांच्या माध्यमातूनच जिल्हा विकसित होऊ शकतो असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुतीचे उमेदवार आणि विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रचारात आघाडी घेतली असून त्यांनी लोकांच्या गाठीभेटी वाढविल्या आहेत. नगर मध्ये प्रचारासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार सुजय विखे यांचासह अनिल शिंदे, सचिन जाधव, दिलीप सातपूते, भैया गंधे, बाळासाहेब वाकडे, सचिन पारखी, प्रशांत मुथा, महेश नामदे, उदय कारळे, करण कराळे, मा. नगरसेविका शिंदे, संपत नलावडे, बाळासाबेह गायकवाड, नितीन शेलार, अशोक गायकवाड, प्रिया जानवे, सविता कोटा व इतर महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.



यावेळी नागरिकांना संबोधित करताना आगरकर म्हणाले की, विखे पाटील कुटुंबांची नाळ जिल्ह्याशी जोडली आहे. मागील ५० वर्षाच्या काळात विखे पाटील कुटुंबांनी जिल्ह्याच्या विकासात भरीव योगदान दिले आहे. यामुळे त्यांच्या चौथ्या पिढीला लोकांनी साथ मिळतआहे. डॉ. सुजय विखे पाटील हे तरूण असून उच्च शिक्षित आहेत. त्याच्याकडे जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा तयार आहे. मागील पाच वर्षात त्यांच्या मार्फत जिल्ह्यात रस्त्यांचे जाळे उभे राहिले, तरूणांना रोजगार मिळावा म्हणुन तीन एमआयडीसीची मुहुर्तमेढ रोवली आहे. बचतगटांच्या मार्फत महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. तर राष्ट्रीय वयोश्री योजनेच्या मार्फत ज्येष्ठ नागरिकांना सहकार्य केले आहे. तसेच जिल्ह्यात सर्वाधिक दुध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळवुन देण्याचे काम त्यांनी केले आहे. यामुळे जिल्ह्यात विकास हवा असेल तर खा. सुजय विखे पाटील हे सर्वोत्तम प्रर्याय आहेत. असे आगरकर म्हणाले.

लोकांनी मतदान करताना आपला नेता कसा असावा याचा विचार करावा, जिल्ह्यातील सुसंस्कृत राजकारणासाठी विखे परिवार ओळखला जातो. आणि सुजय विखे हे केवळ आपल्या विकास कामाच्या जोरावर मतदान मागत आहेत.

देशामध्ये गेल्या १० वर्षामध्ये देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी दाखविलेले विकसित भारताचे स्वप्न पुर्ण करायचे असेल तर खा. सुयज विखे पाटील यांना मतदान केले पाहिजेत. आपल्याला जो मताचा संविधानिक अधिकार मिळाला आहे त्याचा योग्य वापर करा. आणि राष्ट्रहीताचा वापर करणाऱ्या सरकारच्या मागे उभे रहा असे आवाहन ॲड. अभय आगरकर यांनी केले आहे.

# रामनवमीनिमित्त पाथर्डी शहरातून हिंदू रक्षा युवा मंचची लक्षवेधी मिरवणूक

## शहरवासियांच्या डोळ्यांचे पारणे फेडले । शहर झाले भगवेमय



**● पाथर्डी । वीरभूमी –**

हिंदू रक्षा युवा मंचच्या वतीने आयोजित श्रीरामनवमी जन्मोत्सव सोहळ्या निमित्ताने संपूर्ण पाथर्डी शहर अयोध्यामय झाले होते. तरुणांचा उत्साह व रामभक्ताच्या अभुतपुर्व गर्दीत पार पडलेल्या या भव्य दिव्य मिरवणूकीने शहरवासीयांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. शहराच्या इतिहासात आजपर्यंत झाली नाही अशी भव्य दिव्य मिरवणूक शांततेत पार पडली.

एक ही नारा, एक ही नाम, जय श्रीराम, जय श्रीरामच्या घोषणेने शहर दुमदुमून गेले होते. संपूर्ण शहरातील भगव्या पताका, भव्य स्वागत कमानी, शहरातील प्रमुख मार्गावर लावलेली अखंड भगवी झालर यामुळे शहर भगवेमय झाले होते तर लाखो लोकांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

सुमारे दोन किलोमीटर लांबीच्या मिरवणूक मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा मिरवणूक पाहण्यासाठी शहरातील सर्व धर्मीय स्त्री-पुरुषांनी रात्री उशिरापर्यंत प्रचंड गर्दी केली. संपूर्ण मिरवणूक मार्गावर विविध मंडळे व व्यापाऱ्यांनी खाद्यपदार्थ, पिण्याचे पाणी, सरबत वाटप केले. माहेश्वरी युवक मंडळ, जैन सोशल फेडरेशन, रामनाथ बंग मित्र मंडळ यांच्यासह विविध जणांनी शितपेय वाटप केले. मिरवणुकीमध्ये स्त्री-पुरुषांचे रामराज ढोल पथक, सिताहरण देखावा, शिव राज्याभिषेक देखावा, हरियाणा राज्यातून आणलेले महाकाल अघोरी पथक, यातील मिरवणूकेचे खास आकर्षण ठरलेले १२ फूट उंचीचा नंदी त्यावर शिव महाकाल, अघोरी न्यृत्य देखावा, भस्म आरती, शिवपार्वती विवाह, तांडव नृत्य, त्रिनेत्र धारी शंकर व त्यातून निर्माण होणाऱ्या ज्वाला याचबरोबर 'साई सेवा प्रतिष्ठान, 'दिव्य ज्योती जागृती संस्थान', वस्ताद लहुजी साळवे क्रांती मंच, सुवर्णयुग परिवार ट्रस्ट, श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, संत सावता महाराज मंदिर, रामराज्य ढोल, पालखी पथक, वारकरी पथक, राम-लक्ष्मण, सीता, हनुमान आरूढ असलेला व विद्युत दिव्यांनी सजवलेला रथ अशी एकूण तेरा पथके चित्र रथ संदेशासह सामील झाले होते. सलग दोन महिने सराव करत शहरातील स्त्री-पुरुषां सह तरुण-तरुणींनी ढोल ताशाचे अतिशय उत्तम सादरीकरण केले. स्वामी समर्थ मंदिरापासून मिरवणुकीला प्रारंभ झाला. संपूर्ण मिरवणुक मार्ग आकर्षक स्वागत कमानी, भगव्या पताका, सह रांगोळ्यांनी सजवून काही चौकांमध्ये रांगोळी व फुलांच्या पाकळ्यांचा पाय घड्या अंथरल्या होत्या. राममंदिर व रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळा त्यावेळचा उत्साह जसा तसे अगदी वातावरण रामनवमी मिरवणुकीसाठी शहरात झाले होते. मिरवणुकीची वेळ पाहून सर्वच कुटुंबीयांनी व व्यापाऱ्यांनी आपल्या दिवसाचे नियोजन केले. परिसरातील खेड्यापाड्यातूनही भाविक विशेषतः तरुण मंडळी मिरवणूक पाहण्यासाठी व सेवा कार्यासाठी सहभागी झाली. पालिकेच्या कामगारांनी संपूर्ण मिरवणूक मार्गाची साफसफाई केली. मिरवणूक मार्गावर महिलांनी औक्षण व आरती करून पालखी तील रामलल्लाचे दर्शन घेतले. पालखीवर फुलांची उधळण करण्यात आली. आकर्षक फटाक्यांच्या आतिषबाजीने शहर दुमदुमून गेले. खासदार डॉ सुजय विखे, आमदार मोनिका राजळे, राष्ट्रवादीचे नेते ड. प्रताप ढाकणे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, क्षितीज घुले, गोकुळ दौंड यांनी विविध चौकात मिरवणुकीचे स्वागत करत सक्रिय सहभाग नोंदवला.

स्वामी समर्थ मंदिर येथे शंकर महाराज मठाचे महंत माधव बाबा, हभप. सुडके महाराज, रेणुका माता मल्टीस्टेटचे चेअरमन प्रशांतनाना भालेराव, प्रताप ढाकणे, प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, अभय आव्हाड, मृत्युंजय गर्जे, रामनाथ बंग, मुकुंद गर्जे, प्रतिक खेडकर आदींच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. काल सकाळपासून संपूर्ण शहर रामनवमी मय झाले होते. अनेक वर्षाच्या उत्सव परंपरेत शहरात अशी भव्य मिरवणूक प्रथमच पहायला मिळाली. शहर, उपनगरे व परिसरातील प्रत्येक घरातील स्त्री पुरुष लहान मुले ही मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्यावर उतरली होती. हिंदू रक्षा मंचचे उत्सवाचे यंदाचे हे बारावे वर्ष आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व विविध मंडळांच्या कार्यकर्त्यांनी वाहतूक नियोजनासाठी पोलिसांना सहकार्य केले. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी मिरवणुकीत बंदोबस्ताचे चांगले नियोजन केले.

शोभेच्या दारूसह तोफांची भव्य आतिषबाजी, विशाल काय शिव महाकाल व अघोरी पथकाबरोबर फोटो काढण्यासाठी उत्साही लोकांची गर्दी, उत्साहाने राम लक्ष्मणाची वेशभूषा करून आलेली लहान मुले, मिरवणूक बघण्यासाठी सायंकाळी तरुणाईचा ओसंडून वाहणारा उत्साह यामुळे संपूर्ण शहर राममय झाले होते. अशा पद्धतीचे वातावरण पाहून पुढील वर्षी अतीशय भव्य प्रमाणात उत्सव करण्याचा संकल्प संयोजकांनी बोलुन दाखवला. सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते मिरवणुकीत सहभागी झाल्याचे प्रथमच बघायला मिळाले. शहरातील सर्वच तरुण मंडळाचे या मिरवणुकीसाठी मोठे सहकार्य लाभल्याचे आयोजकांनी सांगितले. सुमारे सहा तासांपेक्षा जास्त वेळ चाललेल्या या भव्य मिरवणुकीचा समारोप दक्षिणमुखी हनुमान मंदिरात महाआरतीने झाला.